**मे.शकुंतला मिनरल्स प्रा. लिमिटेड या कंपनीद्वारे दोन डोलोमाईट खाण प्रकल्प खसरा क्र. ६१३, ६१४, ६१५, ६१६, ६१७, ६१८, ६१९, ६२०, ६२१, ६२२ (११.७९ हेक्टर) व खसरा क्र. ६२५,६२६,६२७,६२८, ६२९ (१२.२८ हेक्टर) करवाही, ता.रामटेक, जि.नागपूर येथे प्रस्तावित असून त्यांची प्रस्तावित उत्पादन क्षमता अनुक्रमे २,८६,८७५ टन प्रतीवर्ष व २,७८,९०३ टन प्रतीवर्ष प्रस्तावित प्रकल्पाची दि. २०/०५/२०२६ रोजी घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

*******

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ अन्वये मे.शकुंतला मिनरल्स प्रा. लिमिटेड या कंपनीद्वारे दोन डोलोमाईट खाण प्रकल्प खसरा क्र. ६१३, ६१४, ६१५, ६१६, ६१७, ६१८, ६१९, ६२०, ६२१, ६२२ (११.७९ हेक्टर) व खसरा क्र. ६२५,६२६,६२७,६२८, ६२९ (१२.२८ हेक्टर) करवाही, ता.रामटेक, जि.नागपूर येथे प्रस्तावित असलेल्या प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि. २०/०५/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्पाचे प्रस्तावित स्थळ मे.शकुंतला मिनरल्स प्रा. लिमिटेड, करवाही, ता.रामटेक, जि.नागपूर येथे श्री. अमोल कुंभार, प्रभारी अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे,प्रादेशिक अधिकारी, नागपूर ह्या म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीच्या सदस्या म्हणून उपस्थित होत्या व श्रीमती. धनश्री पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी समन्वयक म्हणून काम केले व अध्यक्षांच्या संमतीने ११.३० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या नागरीकांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे **(सहपत्र-१)**.

**पार्श्वभूमी:-**

मे.शकुंतला मिनरल्स प्रा. लिमिटेड या कंपनीद्वारे दोन डोलोमाईट खाण प्रकल्प खसरा क्र. ६१३, ६१४, ६१५, ६१६, ६१७, ६१८, ६१९, ६२०, ६२१, ६२२ (११.७९ हेक्टर) व खसरा क्र. ६२५,६२६,६२७,६२८, ६२९ (१२.२८ हेक्टर) करवाही, ता.रामटेक, जि.नागपूर उत्पादन क्षमता अनुक्रमे २,८६,८७५ टन प्रतीवर्ष व २,७८,९०३ टन प्रतीवर्ष प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीकरीता अर्ज म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे दि. १६/०२/२०२६ रोजी पत्राद्वारे सादर केलेला होता. त्या अनुषंगाने मंडळाच्या मुख्यालयाचे पत्र क्र. MPCB/JD(WPC)/ENV-PH/B-२६०३०४-FTS-०२९९ दि. ०४/०३/२०२६ व पत्र क्र. MPCB/JD(WPC)/ENV-PH/B-२६०३०४-FTS-०३०० दि. ०४/०३/२०२६ अन्वये जनसुनावणीची प्रक्रिया सुरू करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते **(सहपत्र-२)**.

**प्रयोजन व कार्यपध्दती:-**

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ तथा समन्वयक, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी प्रकल्पाला परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल.त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी,निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी अथवा लेखी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, बने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना क्र. SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994 व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे असे नमुद केले. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक १७/०४/२०२६ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक नवराष्ट्र (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे असे कळविले. वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे **(सहपत्र-३)**.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल तसेच प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या संक्षिप्त अहवाल (इंग्रजी व मराठी मध्ये) व इतर माहिती असलेले कागदपत्रे विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात ३० दिवसापूर्वी नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपूर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत एकुण १ निवेदन म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले असुन प्रत सोबत जोडण्यात येत आहे **(सहपत्र-४)**. मंडळाचा कार्यालयीन आदेश दि. ८/०५/२०२६ नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे **(सहपत्र-५)**.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-१ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार मराठी भाषेत प्रस्तावित डोलोमाईट खाण प्रकल्प उत्पादन क्षमता अनुक्रमे २,८६,८७५ टन प्रतीवर्ष व २,७८,९०३ टन प्रतीवर्ष प्रस्तावित पर्यावरण विषयक बाबीबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणारा परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, काळजी व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-१ यांनी उपस्थितांना सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

१. **श्री.रंजित कुकडे, सरपंच, ग्रा.पं.करवाही, ता.रामटेक,जि.नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | करवाही हा महाराष्ट्राचा शेवटचा गांव आहे, या गावात आदिवासी बहुल क्षेत्र असल्यामुळे येथे रोजगार नाही. या गावातील महिला रामटेक किंवा पारशिवनी येथे मजुरीकरीता जातात. जर हा प्रकल्प मंजुर झाल्यास स्थानिकांना रोजगार मिळेल व शेतकऱ्यांना आधार मिळेल. त्यांनी विनंती केली की, प्रकल्पाला तातडीने नियमानुसार मंजुरीकरीता कार्यवाही करावी. | मुद्दयांची नोंद घेण्यात आली. |

२. **श्री.राजेश गोवर्धन, पोलिस पाटील, करवाही,ता.रामटेक,जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | प्रकल्प सुरू झाल्यास आमच्या सारख्या युवकांना रोजगार मिळेल. रोजगारासाठी गावातील युवक ५० ते १०० कि.मी. अंतरावर असलेल्या एमआयडीसीमध्ये किंवा परराज्यात जातात त्यांना या प्रकल्पामुळे गावाजवळ रोजगार मिळाल्यास त्यांचे कौटुंबिक जीवन सुधारण्यास मदत होईल. सद्यस्थितीत बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे हा प्रकल्प लवकर सुरू झाल्यास आमच्या लोकांसाठी खूप चांगलं होईल. | मुद्दयांची नोंद घेण्यात आली. |

३. **श्री.रविंद्र कुंभरे, करवाही, ता.रामटेक,जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | रोजगारासाठी प्रकल्पास हरकत नाही. | मुद्दयांची नोंद घेण्यात आली. |

४. **श्री.जयराम स्वप्रे, करवाही,ता.रामटेक,जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | करवाही येथे शेतीचे काम आहे आणि शेतीच्या कामामध्ये शेतकऱ्यांना जास्त काही पीक होत नाही. येथील सुशिक्षित लोकं बेरोजगार झालेले असून त्यांची आर्थिक अडचण निर्माण झालेली आहे. त्यामुळे लवकरात लवकर या खदानीचे काम सुरू करावे, जेणेकरून परिसरातील छवारी, दुलारा, मानेगांव, बांद्रा, लोधा, सितापार, पिंडकेपार, गर्रा व सावरा या गावातील बेरोजगार सुशिक्षित युवकांना रोजगार मिळेल. | मुद्दयांची नोंद घेण्यात आली. |

५. **श्री.अश्विन बिसले, करवाही,ता.रामटेक,जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित खदानीमध्ये ब्लास्टींगमुळे शेतकऱ्यांच्या पिकांवर काही दुष्परिणाम व नुकसान झाल्यास जबाबदार कोण राहणार यावर काय नियोजन केले आहे. | यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, ब्लास्टींगमुळे शेतीवर दुष्परिणाम होवू नये म्हणून, ब्लास्टींगकरीता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल व नियमानुसार ब्लास्टींग नियंत्रित करण्यात येईल. शेत पिकांवर परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. ७.५ मीटर उंचीचे सुरक्षित क्षेत्र व सभोवताल वृक्षलागवड करण्यात येईल. या व्यतिरीक्त शेतपिकांचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई देण्यात येईल. |

६. **श्री.सुनंदा रेडी, पर्यावरण तज्ञ**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | या भागातील खाण प्रकल्पासाठी योग्य स्थान निवडल्याबद्दल व्यवस्थापनाचे अभिनंदन करतो. तसेच, या प्रकल्पाचा सविस्तर पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (EIA) अहवाल तयार केल्याबद्दल सल्लागार संस्थेचेही अभिनंदन करतो.<br>तथापि, पर्यावरण आणि आर्थिक विकास यांच्यात समतोल राखण्यासाठी काही सूचना मांडू इच्छितो. या भागातील खाणकाम पूर्ण झाल्यानंतर त्या जागेचे जलसंधारण प्रकल्पामध्ये रूपांतर करावे किंवा खाण क्षेत्र भरून त्यावर वृक्षारोपण करावे.<br>तसेच, प्रस्तावित वृक्षारोपणामध्ये फळझाडे आणि औषधी मूल्य असलेल्या वनस्पतींना प्राधान्य द्यावे.<br>याशिवाय, शासनाच्या सहकार्याने स्थानिक युवक आणि बेरोजगार तरुणांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवावे. यामुळे आपल्या उद्योगाला कुशल मनुष्यबळ मिळेल आणि भविष्यात या युवकांना इतर ठिकाणीही रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.<br>कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) निधीचा वापर लोकांच्या गरजांवर आधारित विकासकामांसाठी करण्यात यावा. यामुळे या परिसराच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळेल. | मुद्दयांची नोंद घेण्यात आली. |

**श्रीमती. हेमा देशपांडे, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर** यांनी खालील मुद्दे उपस्थित केले.

प्रकल्प प्रवर्तक व तांत्रिक सल्लागार यांना दोन्ही खाण पट्टयामध्ये किती अंतर आहे की, वेगवेगळे आहेत याबाबत कुठेच सादरीकरणा दरम्यान उल्लेख झलेला नाही. तसेच दोन्ही खाणपट्टयांचा एकत्रित गट आहे की, ते स्वंतत्र आहे? प्रकल्प रस्त्यालगत असल्याने वाहतुक होणार त्याकरीता पर्यायी रस्ता करणार आहात काय? खदानीमधुन रोज किती वाहनांची वाहतुक होणार आणि या रस्त्याची मजबुती आहे काय, याची खात्री करून घ्यावी, जेणेकरून वाहतुकी दरम्यान इतर लोकांना त्रास होणार नाही.

**प्रकल्प प्रवर्तक/तांत्रिक सल्लागार** यांनी दोन्ही खाणपट्टे वेगवेगळे असल्याबाबत सांगितले व या पट्ट्यांमध्ये ३०० ते ४०० मीटर अंतर आहे. दोन्ही खाणपट्ट्यांचे खाणकाम आराखडा व शासनाची मान्यता वेगळ्या आहेत. तसेच दोन्ही खाणपट्ट्यांसाठी पर्यावरण अनुमती स्वंतत्र राहतील असे स्पष्टीकरण दिले. दोन्ही खाणपट्टे क्लस्टरमध्ये येत असल्याने व त्यांचे एकत्रित क्षेत्र हे २५ हेक्टरपेक्षा जास्त असल्याने या दोन्ही प्रकल्पांना पर्यावरण विषयक जनसुनावणी घेणे अनिवार्य आहे.

**श्री. अमोल कुंभार, अध्यक्ष तथा प्रभारी अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर** यांनी उपस्थितांनी मांडलेल्या मुद्यांची उजळणी केली व उपस्थितांना संबोधले की, या प्रकल्पाविषयी अजून काही बाबी कळाल्या नसतील तर ते निश्चितपणे उपस्थित करावे, जेणेकरून प्रकल्पधारक उपस्थित शंकाचे निराकरण करू शकेल. तसेच या प्रकल्पाविषयी असणारे प्रारूप पर्यावरणीय प्रभाव मुल्यांकन अहवाल व इतर दस्तावेज वेगवेगळ्या शासकीय कार्यालयांमध्ये उपलब्ध करण्यात आले होते. ही जनसुनावणी पर्यावरण विषयक लोकांचे आक्षेप, मुद्दे जाणून घेण्यासाठी आयोजीत केलेली आहे. उपस्थित मुद्द्यांमध्ये प्रामुख्याने रोजगाराचा मुद्दा उपस्थित झाला. तसेच वेळोवेळी येणाऱ्या समस्यांना जसे की, पिकांचे नुकसान इ. यासाठी प्रकल्प प्रवर्तकाने स्थानिकांसोबत संपर्कात राहतील अशी खात्री दिली. उपरोक्त नागरीकांनी उपस्थित केलेले मुद्दे तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे यांची नोंद घेवून शासनाकडे पाठविण्यात येईल.

**श्रीमती.धनश्री पाटील, समन्वयक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ,नागपूर-१** यांनी मा.अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर केले.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(धनश्री पाटील)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-१

Amol kumbhar

(अमोल कुंभार)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर